# आरोग्य सेवा संचालनालय
(महाराष्ट्र राज्य)
## राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम
आरोग्य भवन, ७ वा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई - ४०० ००१

| | |
|---|---|
| संचालनालय-२२६२१०३१-३६<br>संचालक - २२६२०२९२<br>सहसंचालक (एनसीडी) - २२६५३४६०<br>Website : http://maha-arogya.gov.in<br>Fax No. 022-22620234 (DHS) | सहसंचालक (असंसर्गजन्य रोग)२२६२२०२७<br>सहा.संचालक (असंसर्गजन्य रोग) - २२६२१०४७<br>असंसर्गजन्यरोग कक्ष - २२६२३२२२<br>Emai: ncd.mumbai@gmail.com<br>Fax No : 022-226३१/०३/१६42 2048-2054 |


जा.क्र.संआसे/ NTCP/मराठवाडा प्रशिक्षणाबाबत/ /२०१९
दिनांक -5/4 /२०१९

प्रति,
जिल्हा शल्यचिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णालय,
औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड.

**विषय :- राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी होण्याकरीता मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेच्या मदतीबाबत...**

**संदर्भ :- १) Ref. No. MGVS/A80/7027/19 दि. १५/०३/२०१९ चे मराठवाडा ग्रामीण विकास संस्था यांचे पत्र.**

**२) मा. आयुक्त (आ.से), तथा अभियान संचालक, रा.आ.अ.मुंबई यांची दि. ४/४/२०१९ ची मान्य टिप्पणी.**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम हा राज्यातील ३४ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत तंबाखू सेवनामुळे होणारे बरेच असंसर्गजन्य रोग उदा. उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग इत्यादी आजारांवर नियंत्रण प्राप्त करण्यासाठी तंबाखु नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत राज्यामध्ये राबविण्यात येत आहे.

मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली व नांदेड या ६ जिल्हयांमध्ये The Union – International Union agains Tuberculosis and lung Disease च्या तांत्रीक सहयोगाने Advancing Tobacco Control Program राबवीत आहे. या संस्थेच्या सहाय्याने राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावी व गावपातळीवर अंमलबजावणी करणे, जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षातील कर्मचारी/अधिकारी यांच्या समवेत इतर शासकिय कार्यालयीन कर्मचारी व अधिकारी यांना प्रशिक्षण देणे, तंबाखू नियंत्रणात तंबाखू उद्योगींचे हस्तक्षेप ओळखणे तसेच तंबाखू नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कार्यवाही करणे व त्याचे अहवाल जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्फत राज्य तंबाखू नियंत्रण कक्षास वेळोवेळी पाठविणे.

करीता मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) यांच्या Advancing Tobacco Control Program याला मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली व नांदेड या ६ जिल्हयांमध्ये तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थांच्या कार्यशाळा आणि कोटपा कायदा २००३ च्या प्रभावी अंमलबजावणी करीता शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम पार पाडण्याकरीता वरील ६ जिल्हयातील तंबाखू नियंत्रण कक्षामार्फत निशुल्क पद्धतीने सहकार्य करण्यास मान्यता दिली जात आहे. सदर संस्थेला जिल्हा किंवा राज्यस्तरावरुन कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला दिल्या जाणार नाही. तरी वरील ६ जिल्हयातील तंबाखू नियंत्रण कक्षातील जिल्हासल्लागार यांनी या संस्थेमार्फत आपल्या कार्यक्रमाची आखणी करुन त्यावर प्रभावी अंमलबजवणी करावी.

सहसंचालक (असंसर्गजन्य रोग)
आरोग्य सेवा, मुंबई

प्रत माहितीस्तव सादर -
व्यवस्थापक,मराठवाडा ग्रामीण विकास संस्था,प्लॉट नं. २, MBC बिल्डींगच्या मागे,रविराज हॉटेलच्या समोर, औरंगाबाद ४३१००१.